DOIs:10.2018/SS/202207010 --:-- Research Article

# मराठी कथेतील विविध स्थित्यंतरांचे साक्षी असलेल्या नवकथाकार शांतारामांच्या कथेतील विविधतेचा अभ्यास

[1] हेमंत सुधाकर सामंत, [2] डॉ. विशाखा वंजारी
[1] संशोधक, महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, ता. आरमोरी, जिल्हा – गडचिरोली
2 मार्गदर्शक, महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, ता. आरमोरी, जिल्हा – गडचिरोली
Email - hemantsamant65@gmail.com

**सारांश :** शांतारामांची कथा ही भारतीय कुटुंबवत्सल माणसाची कथा आहे, तशीच भारतीय संस्कृतीची प्रगल्भ जाणीव असलेल्या एका लेखकाची कथा आहे. कारण त्यांचा जीवनानुभव आणि त्यांची कथा ही एकजीव झालेली आहे. कलोचित आधुनिकता आणि गतिशील भारतीय परंपरा यांचा सुरेख संगम त्यांच्या कथेतून पाहावयास मिळतो. व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक करताना व्यक्ती आणि समाज यांचे सामंजस्य कसे टिकेल, सहजीवन सौहार्दपूर्ण कसे होईल याचे सतत चिंतन करणारी त्यांची कथा आहे. मराठी कथेतील विविध स्थित्यंतरांचे साक्षी असलेल्या नवकथाकार शांतारामांच्या कथेतील विविधतेचा अभ्यास या संशोधनात केलेला आहे.

**बीजशब्द :** के. ज. पुरोहित, कथाकार शांताराम, नवकथाकार, लघुनिंबध .

## 1. प्रस्तावना :

नवकथाकारांमध्ये ज्यांना पाचवे नवकथाकार म्हणून संबोधण्यात येते ते शांताराम (के. ज. पुरोहित) १९४० पासून कथालेखन करू लागले. आतापर्यंत मराठी लघुकथेची जी स्थित्यंतरे आपण पाहिली त्या स्थित्यंतराचे दर्शन साकल्याने शांतारामांच्या कथांतून पहावयास सापडते इतका व्यापक काळ त्यांनी केवळ 'कथालेखन' या साहित्य प्रकाराला त्यांनी वाहून घेतले. प्राणीकथा, नीतीकथा या सारख्या प्राचीन कथांचे आधुनिक रूप त्यांनी आपल्या कथेतून व्यक्त केले. ('खार', 'शूकसंवाद', 'शिंग' इ. कथा). हरिभाऊंची पाल्हाळीकता, व्यक्तिचित्रणशैली, गोष्टीवेल्हाळपण शांतारामांच्या कथांतूनही दिसून येते. ('एजंट', 'जीवनाचा साक्षात्कार', 'सात जणातील एक', 'नीती', 'धर्म' इ. कथा) दिवाकर कृष्णांच्या निवेदनशैलीचा, काव्यात्मतेचा, कौटुंबिक, सामाजिक जीवनातील वास्तवतेचे स्वरूप शांतारामांच्या कथांतून पहावयास मिळते. ('खार', 'शिरवा', 'योजना', 'सामर्थ्य') खांडेकरांच्या वर्णनशैलीचा, भाषाशैलीचा, जीवननिष्ठेचा पुन:प्रत्यय शांतारामांच्या सुरूवातीच्या कथांतून येतो. ('संत्र्यांचा बाग', 'त्याग', 'ईश्वराची कहाणी', 'प्रत्यय') य. गो. जोशींप्रमाणेच मानवी सहजीवनाची आस, नातेसंबंधातील ताणतणाव त्यांच्या कथांतून व्यक्त होताना दिसतात.

## 2. शांतारामांच्या नवकथेची विलसिते व आगळं-वेगळं स्वरूप :

शांतारामांनी एकीकडे पूर्वसुरींची कथा आपल्या कथेत सामावून घेतली तर दुसरीकडे नवकथेची विलसिते, आगळं-वेगळं स्वरूप दाखवायला सुरुवात केली. 'स्वत:चे शरीर', 'एजंट', 'भेदरेखा', 'काही रात्रींनी गुंफलेली गोष्ट' यासारख्या सुरुवातीच्या त्यांच्या कथा आशयदृष्ट्या आणि आविष्कारदृष्ट्याही वेगळ्या होत्या. 'संत्र्याचा बाग' आणि 'मनमोर' या कथासंग्रहातील बहुतेक कथा पूर्वसुरींची परंपरा पुढे चालविणाऱ्या आहेत. विशिष्ट परिणामाच्या दिशेने केलेली कथानकाची मांडणी, अभिप्रेत कथार्थानुरूप केलेली पात्रनिर्मिती, भावजागृतीची अपेक्षा ठेवणारे प्रसंग आणि सर्व घटकांना यथार्थपणे मूर्त करणारी संकेतनिष्ठ भाषाशैली हे या कथांचे स्थूल विशेष म्हणता येतील. 'शिरवा' या त्यांच्या तिसऱ्या कथासंग्रहापासून शांतारामांच्या कथांचे वेगळेपण स्पष्टपणे प्रकटते. अत्यंत वैयक्तिक अनुभूतीतून स्फुरलेली, हळुवार भावना जपणारी, भावकाव्यात्म गुणांचा व सौंदर्याचा आविष्कार घडविणारी, तरल अनुभव सूक्ष्मपणे अभिव्यक्त करणारी व सर्वार्थाने शांतारामांचे वेगळेपण प्रकट करणारी कथा पहिल्याप्रथम ठसठशीतपणे 'शिरवा'मधून वाचकांसमोर आली. 'छळ', 'जमिनीवरची माणसं', 'लाटा', 'चंद्र माझा सखा' या त्यानंतरच्या कथासंग्रहांनी शांतारामांच्या कथालेखनाला 'शिरवा'नंतर लाभलेली नवी परिमाणे प्रकाशात आणली. जमिनीवरील माणसांच्या मर्यादांचे भान, माणसे समजावून घेण्यामागील समंजस आकलन, स्त्री पुरुषासंबांतील दैहिकता, विघटित होत चाललेले कुटुंबजीवन त्यांच्या कथेने नेमकेपणाने साकार केले. माणसाला साधन म्हणून वापरणारी मूल्यहीन भ्रष्ट जीवनदृष्टी 'अंधारवाटे'द्वारे त्यांच्या कथेने सूचित केली. शांतारामांच्या अनेक कथांतून जमिनीवर प्रेम करणारी माणसे, आपली मूल्ये जपणारी माणसे, दूरत्वाचा अनुभव सोसणारी, तुटलेपणा अनुभवणारी माणसे चित्रित झालेली आहेत.

शांतारामांची लेखणी एखाद्या ब्राह्मण कुटुंबाचा वेध घेताना दिसते. त्याचप्रमाणे आदिवासी समाजाचेही चित्रण करताना दिसते. गडचिरोली, चामोर्शीसारख्या दुर्गम ग्रामीण जीवनाचे त्यांनी चित्रण केले आहे. मानवी जीवनातील सनातन मूल्यांवर त्यांचा दृढविश्वास असल्यामुळे भौतिक परिस्थितीत झालेल्या स्थित्यंतरातही मानवी भाव-भावना, राग-द्वेष, माणसा-माणसांतील परस्परसंबंधही तेच राहतात. व्यक्ती-व्यक्तीमधील मूलभूत संबंधाची सूक्ष्मता वा ढोबळपणाही ते तेवढ्याच आत्मियतेने व्यक्त करताना दिसतात. नागर जीवनातील उद्योजक स्त्री, कचेरीत, रुग्णालयात, शाळा-कॉलेजमध्ये पुरुषांच्या बरोबरीने काम करणाऱ्या स्त्रिया तशाच ग्रामीण समाजातील विविध स्तरांवरील स्त्रियाही त्यांचा कथाविषय बनतात. अशाप्रकारे त्यांच्या कथेतील व्यक्ती दर्शनाचा परिघ फार मोठा आहे. या दृष्टीने त्यांची कथा ही नागर किंवा ग्रामीण अशी ओळख निर्माण न करता कोणत्याही वाचकाला आकर्षित करते.

शांताराम ज्या सामाजिक वातावरणात वावरले, ज्या व्यक्तींचा सहवास त्यांना लाभला, त्या व्यक्तींना त्यांनी सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीसह वास्तव पातळीवर सादर करताना मुळीच संकोच मानला नाही. माणसाचा तिरस्कार करण्याऐवजी, त्यांच्या क्षूद्रतेचे, अमानुषतेचे चित्रण करण्याऐवजी त्यांना समजून घेण्याकडे शांतारामांचा अधिक कल असल्याचे जाणवते. त्यामुळेच कुटुंबातील विविध नाती, विविध सामाजिक संबंध, त्यांच्यातील सौहार्दपूर्णता, संघर्ष, त्यांच्यातील ताण-तणाव, स्त्री-पुरुषसंबंधातील दैहिकता, कामूकता यांचे अत्यंत प्रभावी चित्रण त्यांनी आपल्या कथांतून केलेले आहे. स्त्री-पुरुष, प्रियकर-प्रेयसी, भाऊ-भाऊ, बहिणी-बहिणी, मालक-मजूर, वकील-अशील, डॉक्टर-पेशंट यांतील परस्पर संबंधातून समाजव्यवस्थेचे विशिष्ट रूप जसे साकारले तसेच त्या नात्यातील ताणेबाणे शांतारामांनी साकार केले. या नात्यातील सुरक्षितता जशी त्यांनी दाखविली तशीच त्या विरूद्ध बंडखोरीही व्यक्त केली.

शांतारामांच्या दिवाळी १९९५ च्या ‘लोकसत्ता’ आणि ‘महाराष्ट्र टाईम्स’च्या अंकातील अनुक्रमे 'प्रवास' आणि 'असंगत' या कथा वाचतांना त्यांच्या चिंतनशीलतेचा, मानवतेवरील गाढ श्रध्देचा प्रत्यय देणाऱ्या कथा आहेत. शांतारामांच्या कथालेखनांचा कालखंड दीर्घ असल्याने मराठी कथेतील विविध स्थित्यंतरांचे ते साक्षी आहेत. फडके, खांडेकर, जोशी यांच्यापासून बदललेली कथा त्यांनी न्याहाळलेली आहे. त्याचप्रमाणे समकालिनांच्याही कथा त्यांनी जवळून पाहिलेल्या आहेत. त्यांनी विपुल कथालेखन केले तसेच इंग्रजी, फ्रेंच, रशियन, बंगाली आणि हिंदी कथेवर म्हणजेच एकूण कथासाहित्यावर बोलण्याएवढा व्यासंगही केला. त्यामुळे त्यांच्या कथेत एक प्रकारची जीवनदृष्टी, प्रगल्भता, मूल्यात्मकता आणि मर्मदृष्टीही दिसून येते.

पात्रांच्या वैचारिक प्रगल्भतेचे आणि समाजात वावरतांना आवश्यक लवचिकतेचे दर्शन शांतारामांच्या 'धर्म', 'जमिनीवरची माणसे', 'नीती', 'स्वतःच शरीर', 'घर', 'रती', 'सत्यभामा', 'राधाबाई', 'शंकरगुरू', 'परागंदा', 'चंद्र माझा सखा' इत्यादी अनेक कथांतून होते. या कथा जीवनातील वास्तवाचा ज्याप्रमाणे वेध घेता घेता जीवनातील सामाजिकतेचा, मूल्यात्मकतेचाही वेध घेताना दिसतात. त्यांच्या 'राधाबाई' कथेतील राधाबाई ही एक सामान्य स्त्री आहे. परंतु नवऱ्याने संन्यास घेतल्यानंतर ज्या समर्थपणे आणि धैर्याने तिने संसार केला त्यामुळे ती वाचकांच्या स्मरणात राहते. परंतु राधाबाईचे सामर्थ्य केवळ एकटीने संसार करण्यातून व्यक्त होते असे नाही तर २७ वर्षांनी नवरा घरी येताच ज्या त्यागमय भूमिकेतून ती कपाळाला मळवट भरुन कायमची घर सोडून निघून जाते, त्या त्यागामुळे ती संस्मरणीय ठरते. शंकरगुरूचे अध्यात्मिक उन्नयन, 'स्वतःचे शरीर' मधील गुलाबची मातृत्वापलीकडील वासनेची ओढ, ‘चंद्र माझा सखा’ कथेतील काव्यात्मता, तरलता, सौंदर्याभिमुखता यामुळे त्यांच्या कथांतील व्यक्तिरेखा संस्मरणीय झाल्या आहेत.

त्यांच्या बहुतेक कथा त्यांच्यातील निवेदनशैली, भाषाशैलीमुळे त्या कलात्मक पातळीवर व्यक्त झालेल्या आहेत. मानवी जीवनातील अटळ, नैसर्गिक आणि अत्यंत प्रभावी कामप्रेरणेचे वास्तव दर्शन घडविणे हे ज्याप्रमाणे त्यांच्या कथेने आपले विहित कर्म मानले त्याचप्रमाणे त्या प्रेरणेचे मानवी सहजीवनावर, मानवी संबंधावर, समाज जीवनावर होणारे व्यामिश्र परिणाम प्रत्ययकारीपणे व्यक्त करणे हे ही त्यांच्या कथेने आपले मूलभूत कर्तव्य मानले. स्त्री-पुरुष संबंधात स्त्री जीवनातील नाकारली गेलेली, दबली गेलेली आणि त्यामुळे स्त्री जीवनात जी एक प्रकारची केविलवाणी अवस्था निर्माण करणारी ‘कामप्रेरणा’ तिचे स्वाभाविकपणे, धिटाईने व्यक्तीकरण करणे हा शांतारामांनी आपला धर्म मानला खरे तर असे धाडस त्या काळात (‘संत्र्याचा बाग’) लेखनात दाखवणारे कथालेखक मराठीत नव्हतेच. शांतारामांनी आपल्या कथेतून दबल्या गेलेल्या या स्त्री जीवनातील कामप्रेरणेला मुक्त करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्या कथांतील स्त्रिया बंडखोर, कर्तव्यतत्पर, अधिक प्रगल्भ, अधिक करारी आणि विधायक जाणिवा जोपासताना आपले सत्व आपणच जपायचे असे दाखवतात. शांतारामांच्या कथेतील स्त्रियांची ही भद्रकाली आणि रुद्रकाली रूपे मराठी कथा संपन्न करणारी आहेत. महिला वाचकांना आपले देहभान याची जाणीव करून देणारे शांताराम हे पुरुष वाचकालाही स्त्रीच्या स्वत्वाचे दर्शन घडवून त्याच्या वर्तनात मूल्यात्मक जाणिवांचे प्रक्षेपण करतात.

शांतारामांचे वास्तव्य चंद्रपूर – नागपूर - अमरावतीच्या परिसरात सुमारे पन्नास वर्षे व्यतीत झाल्यामुळे ग्रामीण जीवन हा त्यांच्या जीवनातील जसा एक चिंतनाचा विषय बनला, तसाच तो त्यांच्या कथानुभवाचाही विषय बनलेला दिसून येतो. १९९४ मध्ये प्रकाशित झालेला त्यांचा 'रेलॉ रेलॉ' हा कथा संग्रह हा ग्रामीण कथा संग्रह असल्याचे दिसून येते. त्यातील 'चक्र', 'रेलॉ रेलॉ', 'ओम शांती शांती', 'रानपाखरू', 'विच्छेद', 'वर्ण' इत्यादी कथा या त्यांच्या ग्रामीण जीवनाच्या चिंतनातून साकार झालेल्या आहेत. बदलत्या काळातील बदलते ग्रामीण जीवन, पारंपारिक शेती, घरदार यांच्याविषयी निर्माण झालेले ऋणानुबंध व ते तोडताना व्यक्त झालेला मानसिक संघर्ष, ग्रामीण प्रदेशातून शहरात आल्यावरही ग्रामीण संस्कार जपण्याचा सोस, ग्रामीण भागातील भौतिक बदलामुळे बदलणारे समाज जीवन, बदलणारा माणूस त्यांनी आपल्या ग्रामीण कथांतून चित्रित केलेला आहे. त्यांची ‘पोतराज’ ही कथा पारंपारिक धर्माविरूध्द बंड करणाऱ्या पोतराजाची कथा आहे. ती एका अर्थाने आजची दलित कथा आहे तर व्यापक अर्थाने ती दलित रूढ

कथेपेक्षाही अधिक प्रभावी आणि कलात्मक कथा आहे. या पूर्वीही शांतारामांनी 'घर', 'रक्त', 'परागंदा', 'वेडी', 'झुंज', 'वाढवेल', 'देवाचं शेत' इत्यादी ग्रामीण जीवनावरील कथा लिहिल्या.

शांतारामांनी काही अस्सल ग्रामीण कथा या अत्यंत प्रभावीपणे लिहिल्या असल्या तरी त्यांच्या लेखनामध्ये ग्रामीण कथालेखनाचा अभिनिवेश नाही. कारण कथालेखनाच्या संदर्भात ते असा भेद करू इच्छित नाहीत असे त्यांनी सादर संशोधकाकडे व्यक्त केले होते. त्यांना आपल्या जीवनात जे अनुभव आले ते त्यांनी प्रत्ययकारीपणे आपल्या कथांतून चित्रित केले. शांताराम कथालेखक होण्यापूर्वी लघुनिंबधकार होते. त्यांच्या लघुकथांवर त्यांच्या लघुनिबंधाची छाप असल्याचे त्यांच्या कथांवरून दिसून येईल. लघुनिबंधातून घटवलेली भाषाशैली, चिंतनशीलता, आत्मपरता, जीवन कथेतून सहज व्यक्त झालेली सूचकता, प्रतिकात्मकता, काव्यात्मता, वास्तवता, सहजता, व्यापकता, मूल्यात्मकता, सामाजिकता हे काही विशेष वाचकाला पुन: पुन्हा त्यांच्या कथेकडे आकृष्ट करतात.

'काय गाववाले!' हा १९८९ साली राज्य पुरस्कार मिळालेला शांतारामांचा एकमेव विनोदी कथा संग्रह वाचनीय आहे. 'माझ्या वडिलांचा प्रेम विवाह', 'वाघ', 'चेहरा' यासारख्या या संग्रहातील कथा शांतारामांच्या हलक्या-फुलक्या विनोदाची साक्ष देतात. पाहुण्यांचा ससेमिरा सोडण्यासाठी धर्मांतराची आवई उठवणारे 'बाबुराव', वाघाचे सोंग घेऊन लोकांची करमणूक करणारा 'शेरखान उर्फ वाघ्या', सिनेमाच्या अतिरिक्त वेडापायी जीवनाचे हसे करून घेणारा 'गणपत शिंपी' या काही विक्षिप्त व्यक्तिरेखा त्यांनी संस्मरणीय केल्या आहेत. शाब्दिक कोटी, युक्त्या - प्रयुक्त्या, विनोदी घटना या काही विशेषांनी त्याची विनोदी कथा वाचनीय होते.

## 3. निष्कर्ष :

शांतारामांच्या कथेने मागील पंचाहत्तर वर्षात जे विविध कथाप्रकार हाताळले त्यात नागर कथा, ग्रामीण कथा, विनोदी कथा, आदिवासी कथा, नवकथा आणि अतिनव कथा हे प्रकार सांगता येतील. या सर्वच प्रकारात कायमचे प्रयोगशील राहिलेले नवकथाकार म्हणून त्यांचा विविध स्तरावर केला गेलेला उल्लेख हा युक्तच आहे. या सर्वच कथांचा त्यांच्या आशय आणि आविष्कार यादृष्टीने असलेल्या विविधतेचा विचार करता पुढील निष्कर्ष काढता येतात.

- शांतारामांनी पूर्वसुरींची कथा आपल्या कथेत सामावून घेतली;
- मराठी लघुकथेची जी स्थित्यंतरे आपण पाहिली त्या स्थित्यंतराचे दर्शन साकल्याने त्यांच्या कथांतून पहावयास मिळाले;
- व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक करताना व्यक्ती आणि समाज सहजीवन सौहार्दपूर्ण कसे होईल याचे चिंतन करणाऱ्या कथा आहेत हे लक्षात आले;
- अनेक कथांतून स्त्रियांच्या आत्मभानाला त्यांनी दिलेले महत्त्व अधोरेखित झाले;
- स्त्री-पुरुषसंबंधातील दैहिकता, कामूकता, त्यांचातील ताणतणाव यांचे चित्रण करताना त्यांनी निर्मम दृष्टीने केल्याचे जाणवले;
- त्यांचा न-नैतिक दृष्टीकोण हा दिसून आला;
- त्यांच्या कथेत जीवनदृष्टी, प्रगल्भता, मूल्यात्मकता आणि मर्मदृष्टीही दिसून आली;

कथेच्या सर्वच प्रकारात कायमचे प्रयोगशील राहिलेले नवकथाकार म्हणून झालेली त्यांची ओळख त्यांनी सार्थक ठरवली.

## संदर्भ :

1. पाटणकर रा. भा., मौज प्रकाशन गृह, मुंबई, डिसेंबर १९८८
2. गमे भाऊसाहेब, '१९६० नंतरची कथा: एक आकलन', सक्षम समीक्षा, त्रैमासिक, एप्रिल - मे - जून २०१७, ISSN 22314377
3. आकंठ, दिवाळी २००४,'गत शतकातील मराठी लालित साहित्य', लेख, प्रा. वि. शं. चौघुले
4. डॉ. बान्दिवडेकर, चन्द्रकांत म., 'यात्रा' कहानी संग्रह, भारतीय ज्ञानपीठ, दूसरा संस्करण, २०००
5. जोशी सुधा, पुरोहित के. ज., 'मराठी कथा: विसावे शतक', मॅजेस्टिक प्रकाशन,मुंबई
6. डॉ. बान्दिवडेकर, चन्द्रकांत म., 'मराठी साहित्य परिदृश्य ', वाणी प्रकाशन, १९९७, नयी दिल्ली